कार्यालय नगर परिषद सिंदी(रेल्वे), जिल्हा - वर्धा

nagarparishadsindi@gmail.com Telephone no-07155-266668

क्र नपसिं/प्रमाणपत्र/कावि- ८९० /२०२३ दिनांक-१२ / ०९ /२०२३

प्रति,

श्री. रमेश बद्रीप्रसाद अग्रवाल,
२०३, गुलाब पॅलेस, रामदासपेठ, नागपुर-४४००१०.

विषय:- मौजा सिंदी (रेल्वे) येथील खसरा क्रमांक २४८/२ चे मंजूर लेआऊटचे बाह्य विकासाबाबत कम्प्लेशन (पूर्णत्व) प्रमाणपत्र मिळणेबाबत.

संदर्भ:- १) नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई यांचे स्थायी निर्देश क्र.३३, क्र. नपप्रस विकास कामे/२००५/प्र.क्र.३८५/४२, दिनांक-१८/०५/२००५.
२)या कार्यालयाचे आदेश क्र. नपसि/सा.बा./अभिन्यास/कावी-२९२/२०१९, दि. ३०/०४/२०१९
३) आपले अर्ज दि. ३०/०६/२०२३ अन्वये.

उपरोक्त विषयांकित संदर्भ क्र. ०३ अन्वये आपण मौजा सिंदी (रेल्वे), खसरा क्रमांक २४८/२ आराजी २४५४.४२ चौ.मी. मधील मंजूर अभिन्यासातील विकास कामे पूर्ण झाल्याने सदर विकास कामे पूर्ण झाल्याचे प्रमाणपत्र मिळणेबाबत या कार्यालयाला विनंती केली आहे. संदर्भ क्र. ०२ अन्वये सदर अभिन्यास व त्यामधील भूखंडाना निवासी प्रयोजनासाठी वापरण्याची परवानगी देण्यात आली आहे. तसेच संदर्भ क्र. ०१ मध्ये नमूद स्थायी निर्देश क्र. ३३ मध्ये रेखांकित जमिनीवर आवश्यक किमान नागरी सुविधाबाबत तरतुदी आहेत.

संदर्भ क्र. ०३ अन्वये प्राप्त अर्जावरून केलेल्या मौका पाहणीत आपण संदर्भ क्र. ०१ मध्ये स्थायी निर्देश क्र. ३३ प्रमाणे, खसरा क्रमांक २४८/२ आराजी २४५४.४२ चौ.मी. मधील मंजूर अभिन्यासात विकास कामे व किमान नागरी सुविधा पुरविल्याचे दिसून आले. सबब आपणास खसरा क्रमांक २४८/२ मधील मंजूर अभिन्यासातील विकास कामे पूर्ण झाल्याचे प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

नगर परिषद सिंदी (रेल्वे), जि. वर्धा

मुख्याधिकारी,
नगर परिषद सिंदी (रेल्वे),जि वर्धा.